# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर पिन.४२३१०९

फोन नं).०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०

(Website - www.sai.org.in, Email – purchase@sai.org.in)


## जाहीर फेर ई-निविदा

श्री साईबाबा संस्थानचे लाडू निर्मिती विभागास स्टेनलेस स्टीलची भांडी खरेदीकामी पुरवठाधारक, वितरक, नामांकित उत्पादक कंपन्या यांचेकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

**निविदा किंमत** – १०,०००/- **बयाणा रक्कम** – १,००,०००/-

ई-निविदा व ई-निविदेबाबतच्या अटी-शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

१. निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी दि. ०५/ ०४ /२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि. २५ / ०४ /२०१८ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

२. **निविदा फी व बयाणा रक्कम संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे नावे स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी S.B. A/C No. 30630896801 (IFSC CODE SBIN0005160) या खात्यामध्ये NEFT ने पाठवून अगर ऑनलाईन वर्ग करुन किंवा बॅंक खात्यात भरुन बॅंकेकडून प्राप्त होणारी पावती अगर UTR Number online निविदेसोबत सादर करावी.**

३. निविदाधारकाने सर्व कागदपत्रे ऑनलाईन सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये सादर केलेली कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत.

४. **संस्थानला स्टेनलेस स्टीलची जी भांडी आवश्यक आहेत त्यांचे Specifications, मागणी व अंदाजे वजन पान नं. ८ वर, आणि Drawings निविदेतील फॉर्म पान नं. ९ ते १८ वर दिलेले आहेत. तसेच सर्व भांडयांचे नमुने लाडू निर्मिती विभागाकडे पाहणेसाठी उपलब्ध आहे. ते नमुने पाहूनच ऑनलाईन ई-निविदा भरावी.**

५. शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि. २६/०४/२०१८ रोजी उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा अंशत / पुर्णपणे स्वीकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

**(श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

श्री.साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

शिरडी ४२३ १०९.

तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर

दुरध्वनी क्रमांक (९५-२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,

फॅक्स क्रमांक +९१-०२४२३-२५८८७०

Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.purchase@sai.org.in

मुंबई कार्यालय - साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर

मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३


# लाडू निर्मिती विभागाकरीता स्टेनलेस स्टीलची भांडी पुरविणेची फेर ई – निविदा

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## निविदाधारकांसाठी सूचना

१. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे व इतर शर्ती/अटींचा तपशील सोबत दिलेला आहे.

२. निविदाधारकास निविदेसोबत **निविदा फी रक्कम रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) व बयाणा रक्कम रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख मात्र) NEFT ने संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे नावे स्टेट बँक ऑफ इंडिया S.B. A/C No. 30630896801 (IFSC CODE SBIN 0005160) या खात्यामध्ये स्वतंत्र अगर एकत्र भरुन अगर ऑनलाईन वर्ग करुन बँकेची पावती अगर UTR Number Online निविदेसोबत सादर करावयाचा आहे.**

३. पूर्ण माहिती भरलेली निविदा मुदतीत ऑनलाईन सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे.

४. सदर निविदा दि.५/८/२०१५ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि.२५/८/२०१५ सायं. ०५.०० वा.पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

५. **ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.**

६. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदाधारकांनी ऑनलाईन निविदा भरतांना पान नं. ५ मधील विहीत फॉर्ममध्ये आपली सविस्तर माहिती सादर करावी म्हणजे याबाबत संपर्क करता येईल.

७. अपुर्ण निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

८. कोणतीही निविदा अंशत:/पुर्णपणे स्विकारणेचा अगर सर्व निविदा नाकारणेचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे. त्याबद्दलची कारणे देणे संस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

९. **संस्थानला स्टेनलेस स्टीलची जी भांडी आवश्यक आहेत त्यांचे Specifications, मागणी व अंदाजे वजन निविदेतील फॉर्म पान नं. ८ वर, आणि Drawings पान नं. ९ ते १९ वर दिलेले आहेत. तसेच सर्व भांडयांचे नमुने लाडू निर्मिती विभागाकडे पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. ते नमुने पाहूनच ऑनलाईन ई-निविदा भरावी.**

१०. ई-निविदा भरतांना GST व इतर शासकीय कर, पॅकिंग व फॉरवर्डींग, वाराई, हमाली व वाहतूक वगैरे सर्व खर्चासह दर नमूद करावेत.

११. निविदाधारकाने भांडयाचे कमर्शियल दर भरतांना ते प्रती किलोचे भरावेत. तसेच बीओक्यूमधील शेवटचे रकान्यात पुरविण्यात येणा-या साहित्याचे एका नगाचे वजनही नमूद करावे.

१२. सदर खरेदीची ई-निविदा प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे सुधारीत खरेदी नियमावलीनुसार राबविण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

**(श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री.साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
**शिर्डी– ४२३ १०९. तालुका- राहाता, जिल्हा-अहमदनगर**

## निविदेच्या शर्ती व अटी

१. संस्थानला स्टेनलेस स्टीलची जी भांडी आवश्यक आहेत त्यांचे Specifications, मागणी व अंदाजे वजन निविदेतील फॉर्म पान नं. ८ वर, आणि Drawings पान नं. ९ ते १६ वर दिलेले आहेत. तसेच सर्व भांडयाचे नमुने लाडू निर्मिती विभागाकडे पाहणीसाठी उपलब्ध आहेत. ते नमुने पाहूनच ऑनलाईन ई-निविदा भरावी.

२. **निविदाकाराने बीओक्यूमध्ये दर भरतांना प्रती किलोसाठीचे दर भरावयाचे आहेत. तसेच निविदाधारकाने पुरविण्यात येण-या साहित्याचे वजनही Online BOQ मधील शेवटचे रकान्यात भरावे.**

३. साहित्याचा पुरवठा हा पुरवठा आदेश दिलेपासून १२० दिवसाचे आत करावा लागेल.

४. निविदाधारकास निविदेसोबत निविदा फी रक्कम रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) व बयाणा रक्कम रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख मात्र) NEFT ने संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे नावे स्टेट बँक ऑफ इंडिया S.B. A/C No. 30630896801 (IFSC CODE SBIN 0005160) या खात्यामध्ये स्वतंत्र अगर एकत्र भरुन अगर ऑनलाईन वर्ग करुन बँकेची पावती अगर UTR Number Online निविदेसोबत सादर करावयाचा आहे.

५. दुकान नोंदणी दाखला/स्थनिक स्वराज्य संस्थेचा दाखला/शासकीय उत्पादक परवाना अगर तत्सम शासकीय परवाना, GST नोंदणी सर्टिफिकेट/ऑनलाईन जीएसटी नोंदणी पावती, पॅनकार्ड इ. सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडावीत.

६. साहित्याचे दर भरतांना जीएसटी दराचा बोजाचा विचार करुनच निविदा सादर करावी. निविदाधारकाने सदरचे दर हे शासकीय कर, पॅकिंग व फॉरवर्डींग, वाराई, हमाली व वाहतूक वगैरे सर्व खर्चासह शिर्डी संस्थानचे भांडार/लाडू निर्मिती विभागात पोहोचचे सर्व समावेशक नमूद करावेत. कुठलाही खर्च वेगळा आदा केला जाणार नाही.

७. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत साहित्याचा पुरवठा करावयाची हमी म्हणून मंजुर एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षां अनामत म्हणून ठेवावी लागेल. निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर १५ दिवसाचे आत सदर रकमेचा भरणा संस्थानकडे करावा लागेल. **सुरक्षा अनामत रक्कम साहित्याचा पुरवठा पुर्ण केलेनंतरच परत केली जाईल.** सुरक्षा अनामत रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

८. निविदा मंजूर झालेनंतर शिर्डी येथे येऊन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकांस आदा करावी लागेल.

...२...

९. ज्या साहित्याच्या निविदा मंजुर होतील ते साहित्य मान्य झालेल्या वर्णनाचे/साईजचे/दर्जाचे पुरवावे लागेल. कमी दर्जाचे, वेगळयाच कंपनीचे साहित्य स्विकारले जाणार नाही. अशा साहित्याचा पुरवठा झाल्यास ते स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. ते न नेल्यास, त्याची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

१०. वरील अ.नं.७ व ८ च्या अटीची पूर्तता केलेनंतर संस्थानकडून साहित्याचा पुरवठा आदेश दिला जाईल.

११. निविदाधारकाने पुरविलेले साहित्य संस्थानचे निविदेतील व पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणे नसल्याने नाकारल्यास व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून साहित्याची खरेदी करावी लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर साहित्याच्या बिलातुन वसुल केली जाईल.

**१२. पुरवठा केलेले साहित्य संबंधीत विभागाने स्विकारलेनंतर त्यांचे अभिप्रायानुसार १ महिन्याचे आत बील आदा करणेचा प्रयत्न राहील. साहित्याच्या पुरवठ्याबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.**

१३. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

१४. शासन नियमानुसार लागू असलेल्या कर/कपाती बिलातून करण्यात येतील.

१५. पुरवठा आदेशातील कंपनीच्या व वर्णनाच्या साहित्याचा पुरवठा करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित पुरवठाधारकाची राहील व त्याप्रमाणे साहित्याचे बील द्यावे जागेल.

१६. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी निविदा मुदत संपल्याचे तारखेपासून १५० दिवसांचा राहील.

१७. राज्याबाहेरील निविदाधारकाची निविदा मंजूर झाल्यास शासन खरेदी नियमावलीतील नियम क्रं.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकाच्या दरात साहित्य पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या साहित्याच्या ५०% साहित्याचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादारांना देण्यात येतील व जर ते तयार नसतील तर पुर्ण साहित्याचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादारांना देण्यात येईल.

**१८. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.**

१९. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

२०. साहित्य पुरविणेचा पुरवठा आदेश दिलेपासून १२० दिवसांचे आंत मागणीप्रमाणे साहित्याचा पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीचे नसल्यामुळे त्या नाकारले गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने साहित्य दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या साहित्यासाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या साहित्याच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

२१.निविदेतील मंजुर दराने साहित्याचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही.

२२. निविदा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी निविदाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक मालाचा पुरवठा करु शकला नाही व तसे निविदाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल.

२३. पुरवठा आदेशातील साहित्याचा मागणीप्रमाणे वेळेत पुरवठा केला नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

अ) पुरवठा न केलेले साहित्याची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास – प्रती आठवडा ००.५० % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत दंड आकारण्यात येईल.

आ) पुरवठा न केलेले साहित्याची किंमत रु.२.०० लाखापेक्षा जास्त असल्यास – प्रती आठवडा ००.५०% दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत पर्यंत दंड आकारण्यात येईल.

तथापि विलंबाने पुरवठा केलेली भांडी स्विकारणेचे बंधन संस्थानवर राहणार नाही.

२४. निविदेच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता निविदा रद्द करणे किंवा स्थगित करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखीव ठेवलेला आहे.

**(श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री.साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ----------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ----------------------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ----------------------------------------------------------------

ऑफीस ----------------------------------------------------------------

दुकान ----------------------------------------------------------------

निवास ----------------------------------------------------------------

मोबाईल नंबर ----------------------------------------------------------------

फॅक्स नंबर ----------------------------------------------------------------

ई – मेल ----------------------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ----------------------------------------------------------------

दूरध्वनी क्रमांक- ----------------------------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे- १. ----------------------------------------------------------------

२. ----------------------------------------------------------------

दिनांक - / /२०१८
ठिकाण -

निविदाधारकाची सही व शिक्का

अ) **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ (उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका)
अगर तत्सम शासकीय परवाना / शासकीय उत्पादक परवाना

२. GST नोंदणी प्रमाणपत्र किंवा ऑनलाईन GST क्रमांक पावती

३. पॅन कार्ड

४. बयाणा रक्कम UTR Number / बॅंक भरणा पावती

५. निविदा किंमत UTR Number / बॅंक भरणा पावती

दिनांक - / /२०१८
ठिकाण -

**निविदाधारकाची सही व शिक्का**

प्रति,

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय– लाडू निर्मिती विभागाकरीता स्टेनलेस स्टीलची भांडी पुरविण्याचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत. नियमाप्रमाणे बयाणा रक्कम ऑनलाईन भरलेली आहे.

ज्या साहित्याच्या निविदा मंजुर होतील, त्या मान्य दराने साहित्याचा पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर साहित्याच्या एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख/DD/RTGS/NEFT द्वारे भरणा करु. अशी रक्कम मी भरणा न केल्यास, बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व मंजूर दराने निविदा कालावधीत मागणीप्रमाणे साहित्य वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०१८

ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव

सही/सहया व शिक्का


(१) ----------------------------------

(२) ----------------------------------


**सोबत-** कागदपत्रे

# खरेदी करावयाचे साहित्याचा तपशिल


| अ.नं. | तपशिल | वर्णन (साईज MM मध्ये) | ग्रेड | जाडी (MM मध्ये) | अंदाजे वजन प्रती नग (किलो मध्ये) | खरेदी करावयची नग संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्टेनलेस स्टील पातेले (मध्यम) | वरचा व्यास - ११४३ mm,<br>तळाचा व्यास - ११०४.९ mm,<br>उंची - ५३३ mm | ३०४ ग्रेड<br>८ % निकेल | ६ | ११२.००० | १२ नग |
| २ | स्टेनलेस स्टील कढई (मोठी) | व्यास - १३८४.३ mm,<br>उंची - ३८१mm | ३०४ ग्रेड<br>११ % निकेल | ५ | ८२.००० | १५ नग |
| ३ | स्टेनलेस स्टील कढई (मध्यम) | व्यास - ९१४.४ mm,<br>उंची - २८०.७ mm | ३०४ ग्रेड<br>८ % निकेल | ५ | ४०.००० | ४० नग |
| ४ | स्टेनलेस स्टील पराती | वरचा व्यास - १०९२.२ mm,<br>तळाचा व्यास - ९३९.८ mm,<br>उंची - १५२.४ mm | ३०४ ग्रेड<br>८ % निकेल | १.५ | १५.००० | १०० नग |
| ५ | स्टेनलेस स्टील ट्रे (मोठे) | वरचा व्यास १०९२.२ mm,<br>तळाचा व्यास ९९०.६ mm<br>उंची - १५२.४ mm | ३०४ ग्रेड<br>८ % निकेल | १.५ | १४.००० | १०० नग |
| ६ | स्टेनलेस स्टील कडी टप | वरचा व्यास - ४०६ mm,<br>बाहेरील उंची - २५४ mm,<br>आतील उंची - २१५.९ mm | २०२ ग्रेड<br>४ % निकेल | ०.८५ | ४.००० | १०० नग |
| ७ | स्टेनलेस स्टील चंचुपात्र (गंज) | वरचा व्यास - ३८१ mm,<br>बाहेरील उंची - ३३०.२ mm,<br>आतील उंची - ३३०.२ mm, | ३०४ ग्रेड<br>८ % निकेल | १.५ | ५.५०० | १०० नग |
| ८ | स्टेनलेस स्टील टोप (लहान) | व्यास ५५८.८ mm ,<br>उंची - ३०४.८ mm, | ३०४ ग्रेड<br>८ % निकेल | ३.१२ | १९.००० | २५ नग |
| ९ | स्टेनलेस स्टील पातेले (मोठे) | वरचा व्यास - १२३१.९ mm,<br>तळाचा व्यास - ११६८.४ mm,<br>उंची -४८२.६ mm, | ३०४ ग्रेड<br>८ % निकेल | ६ | ११८.००० | २५ नग |
| १० | स्टेनलेस स्टील पातेले (लहान) | वरचा व्यास - १००३.३ mm,<br>तळाचा व्यास - ९२७.१ mm,<br>उंची - ४८२.६ mm, | ३०४ ग्रेड<br>८ % निकेल | ६ | ९८.००० | ३० नग |




| S.No.1 | Stainless Steel Vessel (Patele) |
|---|---|




| S NO 2 | STAINLESS STEEL CAULDRON | DATE 21/08/2017 |
|---|---|---|




| S No. 3 | SS Kadhai |
| --- | --- |




| S.No.4 | S.S. Parat |
|---|---|







| | |
|---|---|
| S No 5 | S S Tray big |




| S.No. 6 | Stainless Steel Kadi Tap |
| --- | --- |




S No 7 | S S Chanchupatra (Gani)



| S.No.08 | S.S. Tope |
|---|---|



| S.No.10 | S.S. Patele Big |
|---|---|



| | |
|---|---|
| S No 11 | S S Patela Small |

# खरेदी करावयाचे साहित्याचा तपशिल

| अ.नं. | साहित्याचे वर्णन / वस्तुचे वर्णन | मागणी | एकक | निविदधारकाने भरावयाचे सर्व कर समावेशक दर प्रती किलो ग्रॅम | एकूण रुपये | अक्षरी रुपये | निविदाधारकांनी द्यावयाचे अंदाजे वजन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्टेनलेस स्टील पातेले (मध्यम) | १ | किलो | | | | |
| २ | स्टेनलेस स्टील कढई (मोठी) | १ | किलो | | | | |
| ३ | स्टेनलेस स्टील कढई (मध्यम) | १ | किलो | | | | |
| ४ | स्टेनलेस स्टील पराती | १ | किलो | | | | |
| ५ | स्टेनलेस स्टील ट्रे (मोठे) | १ | किलो | | | | |
| ६ | स्टेनलेस स्टील कडी टप | १ | किलो | | | | |
| ७ | स्टेनलेस स्टील चंचुपात्र (गंज) | १ | किलो | | | | |
| ८ | स्टेनलेस स्टील टोप (लहान) | १ | किलो | | | | |
| ९ | स्टेनलेस स्टील पातेले (मोठे) | १ | किलो | | | | |
| १० | स्टेनलेस स्टील पातेले (लहान) | १ | किलो | | | | |

**सदर साहित्याची Specifications, मागणी व अंदाजे वजन ई-निविदेतील पान नं.८ वर सविस्तर दिलेले असून ते पाहूनच BOQ मध्ये प्रती किलोचे दर भरावेत.**

17/03

**(श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

श्री.साईबाबा संस्थानविश्वस्तव्यवसथा,शिर्डी